| दाखल दि. | ०३.११.२०२३ | | |
|---|---|---|---|
| नोंदणी दि. | ०३.११.२०२३ | | |
| निकाल दि. | २४.०३.२०२६ | | |
| कालावधी | २ वर्ष | ४ म. | २१ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय, सिंदखेडराजा, कोर्ट क्र. ०३ यांचे न्यायालय**

**(पिठासीन अधिकारी रामराजे पं. मगर)**

**फौजदारीचे नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र. XXXII प्रमाणे**
**भाग – 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ)**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (I)]

**नि.फौ.ख.क्र. १६३/२०२३** **नि.क्र. ३८**

महाराष्ट्र सरकारतर्फे
पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे, किनगांव राजा,
ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा. ..**अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. दिपक उर्फ सोनु बळीराम गंडे,

२.गणेश बळीराम गंडे,

आरोपी क्र. १ व २ रा. बोरखेडी गंडे, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा.

..**आरोपी**

**भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, २९४, ५०४, ५०६**
**सहकलम ३४ अन्वये**

अभियोग पक्षातर्फे – सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती टी. व्ही. बाहेकर,

आरोपीतर्फे – अधिवक्ता श्री. के. के. शेळके,

**भाग — 'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०४.०८.२०२३ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०९.०८.२०२३ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०३.११.२०२३ |
| दोषारोप निश्चित तारीख | ११.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | ११.०३.२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णय करीता ठेवले ती तारीख | २४.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४.०३.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | -- |

**आरोपीचा तपशील**

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी.आर.पी.सी. प्रमाणे शिक्षेमधुन सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दिपक उर्फ सोनु बळीराम गंडे | – | ०७.०२.२०२५ | ३२४, ३२३, २९४, ५०४, ५०६ सह कलम ३४ भा. दं. वि | निर्दोष | निरंक | निरंक |
| ०२ | गणेश बळीराम गंडे | | | | | | |

# <u>न्यायनिर्णय</u>

(दि. २४.०३.२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, २९४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,</u>**

१. दिनांक ०४.०८.२०२३ रोजी संध्याकाळी अंदाजे ७.०० वाजता फिर्यादी घरी असतांना त्यांचा मुलगा मनोज नामदेव गंडे व पत्नी यमुनाबाई हे शेतातुन काम करुन घरी आले. घरासमोर मनोज हा बैलगाडी सोडुन बैल खुट्यावर बांधत असतांना आरोपी संदीप बळीराम गंडे हा दारु पिऊन तेथे आला व विनाकारण फिर्यादीच्या मुलाचा गळा धरुन चापटा–बुक्क्यांनी मारहाण करु लागला. आरोपीने फिर्यादीच्या मुलाला तुझ्या मायची गांड असे म्हणुन अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर सोनु गंडे आणि गणेश गंडे हे तेथे आले व त्यांनी मनोज यास कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी व त्यांची पत्नी भांडण सोडविण्यासाठी तेथे आले असता सर्व आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या पत्नीला सुध्दा मारहाण करुन, शिवीगाळ केली व जिवाने मारण्याच्या धमक्या दिल्या.

२. सदर फिर्यादवरुन पोलीस ठाणे, किनगावराजा राजा येथे अपराध क्र. १५४/२०२३ नुसार आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, २९४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासी अंमलदार यांनी जखमीला वैद्दकीय तपासणीसाठी पाठवून वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले. त्यानंतर घटनास्थळ व पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीना सुचनापत्रावर सोडुन दिले आणि आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोप पत्र दाखल केले. तपास अधिकारी यांनी प्रथम खबरी अहवालात दर्शविल्याप्रमाणे ३ आरोपींच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. प्रस्तुत खटला प्रलंबित असतांना आरोपी नामे, संदिप बळीराम गंडे हा मयत झाला. त्यामुळे या न्यायालयाने सदर आरोपीच्या विरुध्द खटला संपुष्टात आणला(अबेट केला). त्यामुळे उर्वरीत आरोपींच्या विरुध्द सदरचा खटला चालविण्यात आला.

३. दि. ११.०३.२०२६ रोजी आरोपीविरुध्द **नि.क्र. २६** वर भा.दं.वि.चे कलम ३२४, ३२३, २९४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवले. त्यातील मजकुर आरोपींना त्यांच्या मातृभाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपीं विरुध्द खटल्यामध्ये पूरावा न मिळुन

आल्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे त्यांचा जबाब वगळण्यात आला. दोन्हीं पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील कारण मिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे नोंदवित आहे:–

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपी क्र. १ व २ यांनी दि. ०४.०८.२०२३ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता फिर्यादीच्या मुलाला कुऱ्हाडीच्या दांड्याने हल्ला करून इच्छापुर्वक दुखापत केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३२४ सह कलम ३४ नूसार अपराध केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .. नाही |
| २. | आरोपी क्र. १ व २ यांनी वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी फिर्यादीच्या मुलाला व पत्नीला मारहाण केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३२३ सह कलम ३४ नूसार अपराध केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .. नाही |
| ३. | आरोपी क्र. १ व २ यांनी वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, फिर्यादीच्या मुलाला सार्वजनिक ठिकाणी "तुझ्या मायची गांड" असे म्हणुन अश्लील शिवीगाळ केली व त्याव्दारे कलम २९४ सह कलम ३४ नूसार अपराध केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .. नाही |

| | | |
|---|---|---|
| ४. | आरोपी क्र. १ व २ यांनी वरील दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यायोगे फिर्यादीच्या मुलाला व त्याच्या पत्नीला प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे आरोपी यांचा उद्देश होता व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असणारा अपराध केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | .. नाही |
| ५. | आरोपी क्र. १ व २ यांनी वरील दिवशी वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या मुलाला व पत्नीला जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०६ सह कलम ३४ नूसार अपराध केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .. नाही |
| ६. | आदेश काय ? | .. अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

५. आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. सा.क्र.१ फिर्यादी नामदेव लिंबाजी गंडे **नि क्र. ३०**, सा. क्र. २ यमुनाबाई नामदेव गंडे, **नि. क्र. ३२** व सा. क्र. ३ नामे,

मनोज नामदेव गंडे **नि. क्र. ३५** वर साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर, अभियोग पक्षाने इतर साक्षीदार यांना तपासले नाही. त्यामुळे, नि.क्र १ वरील आदेश करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ करीता</u>**

६. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्या कारणाने मी त्यांचे विवेंचन एकत्रितरित्या करत आहे. सा.क्र.१, सा. क्र. २ आणि सा. क्र. ३ यांनी सरकार पक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. साक्षीदार क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या साक्षी पुराव्यात असे कथन केले की, आरोपींनी फिर्यादीच्या पत्नीला व मुलाला कोणत्याही प्रकारची दुखापत केली नाही, मारहाण केली नाही, अश्लील भाषेत शिवीगाळ केली नाही तसेच फिर्यादीच्या पत्नीला व मुलाला जिवाने मारण्याची धमकी दिली नाही. तसेच, पूढे हे मान्य केले की, त्यांनी सदरचे प्रकरण आरोपी सोबत न्यायालया बाहेर आपसात तडजोडीने मिटविलेले आहे. सदरच्या साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे विशेष सह. साहाय्यक अभियोक्ता श्रीमती टी. व्ही. बाहेकर यांनी सदरील साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवाणगी मागीतली. त्यामुळे परवाणगी देण्यात आली. सदरील साक्षीदारांच्या उलटतपासा मधुन देखील अभियोग पक्षास पुरक असा पुरावा या न्यायालया समोर आलेला

नाही. त्यामुळे साक्षीदार क्र. १, सा. क्र. २ आणि सा. क्र. ३ यांची साक्ष ही अभियोग पक्षास सदरचा गुन्हा सिध्द करण्याकरीता फायदेशीर ठरली नाही.

७. तसेच या ठिकाणी असे नमुद करणे गरजेचे आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी व सा. क्र. २ आणि सा. क्र. ३ हे त्यांना आरोपींनी त्यांना कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण केल्याचे, लाथाबुक्क्यांनी मारहाण, शिवीगाळ केल्याचे व जिवाने मारण्याची धमकी दिल्याचे स्पष्टपणे नाकारतात. त्यामुळे, आरोपीं विरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे आरोपीवरील उपरोक्त कलमांन्वये दोषारोप निर्विवादपणे सिध्द होत नाही.

८. बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामा तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केल्यामुळे घटनास्थळ पंचनामा व वैद्यकीय प्रमाणपत्र हे शाबीत झाले. तरी देखील, केवळ वैद्यकीय प्रमाणपत्र व घटनास्थळ पंचनामा शाबीत झाल्याच्या कारणावरुन ही बाब अभियोग पक्ष सिध्द करु शकत नाही की, आरोपींनी फिर्यादीस फिर्यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे गुन्हा केलेला आहे.

९. सदरील प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थीती विचारात घेता या ठिकाणी मा. सर्वोच्च न्यायालय, यांच्या खालील दोन न्यायनिर्णयांचा उल्लेख करणे गरजेचे आहे. ती प्रकरणे खालीलप्रमाणे :–

१) ***सतिश मेहरा विरुध्द दिल्ली अॅडमिनीस्ट्रेशन व इतर, १९९६(९) एससीसी ७६६*** या निवाडयात माननीय सर्वोच्च न्यायालयाने विषद केले आहे की,

> 'खटल्याकामी अंतिमतः शिक्षा होईल अशी स्थिती नाही असे जेव्हा न्यायालयाला निश्चितपणे वाटेल त्यावेळी औपचारीक प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी न्यायालयाचा बहुमुल्य वेळ चौकशी घेणेत व्यर्थ खर्चू नये.'

२) ***मदन मोहन अबोट वि. स्टेट ऑफ पंजाब, ए.आय.आर. २००८ सुप्रीम कोर्ट १९६९'*** या निवाडयात मा. सर्वोच्च न्यायालयाने विषद केले आहे की,

> 'फौजदारी वाद आपसात मिटला असेल तर न्यायालयांनी विनाकारण वेळ खर्च करणे उचीत नाही.'

१०. वरील न्यायनिर्णयातील न्यायतत्वाचे अवलोकन करता आणि सदर खटल्यामध्ये सा.क्र. १ ते ३ यांचा पूरावा पाहता आरोपीने वरील कलमानुसार गुन्हा केला आहे असे पूराव्यानिशी कोठेही शाबीत होत नाही, सिध्द होत नाही. तसेच, सदर खटला देखिल फिर्यादीने आपसात तडजोडीने मिटविलेला असल्याने आरोपीचा गुन्हयात सहभाग होता इतपत पूरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मी या निर्णयाप्रत येऊन पोहोचलो आहे की, आरोपींनी फिर्यादीस मारहाण व शिवीगाळ करुन जिवे

मारण्याची धमकी दिली ही बाब सरकार पक्ष संक्षया पलीकडे सिध्द करु शकला नाही. त्यामुळे भा.दं.वीचे कलम ३२४, ३२३, २९४, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे आवश्यक ते घटक खटल्यात कोठेही शाबीत झालेले नाहीत. **करिता, मी मुद्दा क्र. १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.**

<u>मुद्दा क्र. ६ करीता</u>

११. **मुद्दा क्र. १ ते ५** चे निष्कर्ष लक्षात घेता, आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. प्रस्तुत प्रकरणात जप्त एक लाकडी काठी/दांडा मुल्यहीन असल्यामुळे ती अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करणे न्यायोचीत राहील. सबब, मुद्दा क्र. १ ते ५ चे निष्कर्ष लक्षात घेता, मुद्दा क्र. ६ च्या निष्कर्षात मी खालील आदेश पारीत करीत आहे :–

## <u>आदेश</u> :

१. आरोपी क्र. १ नामे, **दिपक उर्फ सोनु बळीराम गंडे** व आरोपी क्र. २ **गणेश बळीराम गंडे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, २९४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये च्या शिक्षापात्र गुन्ह्यातुन

निर्दोष मुक्तता करण्यात आली.

२. आरोपचे बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. गुन्ह्यातील मुद्देमाल एक आडजात दांडा मुल्यहीन असल्यामुळे तो अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ रक्कम प्रत्येकी रुपये १५०००/– इतक्या रकमेचा वैयक्तीक जात मुचलका व जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

स्वा/–
**रामराजे पं. मगर,**
दि.२४.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
सिंदखेड राजा, कोर्ट क्र. ३

**भाग – 'क'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्ष –**

| **स्थान** | **नाव** | **निशाणी** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| सा.क्र.०१ | नामदेव लिंबाजी गंडे | ३० | फिर्यादी |
| सा.क्र.०२ | यमुनाबाई नामदेव गंडे | ३२ | साक्षीदार |
| सा.क्र.०३ | मनोज नामदेव गंडे | ३५ | साक्षीदार |

**ब) बचाव पक्ष, असल्यास –**

| **अ.क्र.** | **नाव** | **निशाणी** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास –**

| **अ.क्र.** | **नाव** | **निशाणी** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन कागदपत्रांची / निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या दस्तांची यादी**

**अ) अभियोग पक्ष –**

| **अ.क्र.** | **निशाणी** | **दस्तऐवजांचे स्वरुप** |
|---|---|---|
| ०१ | ३६ | घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ०२ | ३७ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

**ब) बचाव पक्ष –**

| **अ.क्र.** | **निशाणी** | **तपशील** |
|---|---|---|
| – | – | – |

**क) बचाव पक्ष –**

| **अ.क्र.** | **निशाणी** | **तपशील** |
|---|---|---|
| – | – | – |

**ड) भौतिक वस्तु –**

| **अ.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| – | – | – |

स्वा/–

**रामराजे पं. मगर,**

दि.२४.०३.२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

सिंदखेड राजा, कोर्ट क्र. ३

**Certificate**

I affirm that, the contents of this PDF are same word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of Clerk | : Shri. A.S. Zine |
| Name of Court | : 2nd Jt C.J.J.D. & J.M.F.C., Sindkhed Raja, Court No. 3 |
| Uploaded on date | : 27.03.2026 |